**नियमित फौजदारी केस नं. ५६/२०१५**

**नि. क्र. १५१**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ चा जबाब शपथेवर सुरु.**

**माझे नाव –** रमेश श्रीराम मोरे,

**वय –** ५० वर्ष, **धंदा–** शेती,

**राहणार –** ओझरखोल, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून सुरु –**

**०१**. दिनांक १०/०३/२०१४ रोजी मला पोलीसांनी कोठेही बोलावले नव्हते. मी लाकूड खाली करीत असताना पोलीस तेथे आले होते. त्यानंतर पाऊणतासाने ते माझ्याकडे आले व त्यांनी माझ्या चार ते पाच सहया घेतल्या. असे काही घडले नाही की, पोलीसांनी मला 'विजय श्री सॉ मिल' लाकडाचे गिरणीच्या बाजूला बोलावले होते.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०२**. हे म्हणणे खरे नाही की, सदर सॉ मिल लाकडाच्या गिरणीच्या बाजूला पोलीसांनी मला बोलावून पम्या प्रकाश सुर्वे याच्या घराची घर झडती घेण्यासाठी पंच म्हणून हजर राहण्यासाठी मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर गिरणीच्या बाजूला उभ्या असलेल्या इसमास पोलीसांनी प्रणय प्रकाश सुर्वे याचे राहते घर कोठे आहे असे विचारले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या इसमाने दाखविल्यानुसार सदर घराकडे गेलो असता त्याचा दरवाजा बंद स्थीतीत होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर घराची कडी थोठावली असता दरवाजा उघडून एक इसम समोर आल्यावर त्याला पोलीस व पंचांची ओळख दिल्यानंतर त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश सुर्वे सांगितले व त्याला घर झडतीचा उद्देश

समजावून सांगितला.

**०३**. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकाश सुर्वे यांना विचारले असता त्यांनी घराचा क्रमांक नावडी ग्रामपंचायत घर क्र. २०३ असा सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, सदर घर सिमेंट काँक्रीटचे असून त्याला प्रवेश करण्यासाठी २० फूट लांबीची गॅलरी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरातील प्रणव प्रकाश सुर्वे यांच्या बेडरुम मधील कपाटातून एका प्लॅस्टीक पिशवीतून एक काळया रंगाचा सर्च लाईट व वायर मिळून आली होती व ती पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केली होती.

**०४**. हे म्हणणे खरे नाही की, तया घराच्या बाजूला प्रकाश सुर्वे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तेथे माझ्या समक्ष मिळून आलेला मुद्देमाल जप्त करुन तसा पंचनामा माझ्यासमक्ष केला व लाईटवर माझ्या सहीचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, तसा पंचनामा मी वाचून पाहून तो मजकूर बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपी क्र. ०१, ०२ व ०४ तर्फे विद्वान विधीज्ञा कु. अंकीता पवार व आरोपी क्र. ०३ तर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.11 18:12:56 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक –११.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCC No. 56-2015

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 11/07/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 11/07/2025 |
| Evidence uploaded on | : | 11/07/2025 |